PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Majhi Manase

Year:

Song: Muli Tu Raha Sukhi Sansari

Lyricist:

घे आशिष माझे असे जरी गं
दु:ख खोल अंतरी
घे आशिष माझे असे जरी गं
दु:ख खोल अंतरी
मुली तू रहा सुखी संसारी
रहा सुखी संसारी
रहा सुखी संसारी
मुली तू रहा सुखी संसारी

इवली होतीस गोड साजिरी छकुली
खेळत माझ्या अंगा खांद्यावरती
कधी ना कळले फूल कळीचे झाले
ह्या जगण्याचे गंध अनोखे होती
आता फुलाया निघालीस तू
दुसऱ्या वेलीवरी
मुली तू सुखी संसारी
रहा सुखी संसारी
रहा सुखी संसारी
मुली तू रहा सुखी संसारी

लग्नाची का उठाठेव ही
कर्मकांड का खोटी
आधीच म्हणे देवाने या
स्वर्गात मारल्या गाठी

बंधन नाही हे दोघांचे
मोठी त्याची व्याप्ती
दोन घरातील एकेकांची
जोडून जाती नाती
परकी होती काल वरी ती
आज सगेसोयरी
मुली तू रहा सुखी संसारी
रहा सुखी संसारी
रहा सुखी संसारी
मुली तू रहा सुखी संसारी

मंगल तोरण पहा बांधले
आज तुझ्या गं दारी
आनंदाला उधाण आले
जमलो येथे सारी
घे आशिष आमुचे असे जरी गं
दु:ख खोल अंतरी
घे आशिष आमुचे असे जरी गं
दु:ख खोल अंतरी
मुली तू रहा सुखी संसारी
रहा सुखी संसारी
रहा सुखी संसारी
मुली तू रहा सुखी संसारी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*